जनसामान्यांची महाशक्ती
# नवशक्ति
सा शक्तिर्या विमुक्तये
किंमत ₹३
www.navshakti.co.in | मुंबई | वर्ष ८६ वे अंक : ३५४ | मंगळवार, ३ नोव्हेंबर २०२० | पाने : १६ | Reg.No.MCS/049/2018-20/RNI No.1691/57 m.p.c.s. office mumbai-400 001

**मुंबईचे तापमान**
कमाल : ३३ अं.से. किमान : २३ अं.से.

**शेअर बाजार**
सेन्सेक्स : ३९,७५७ (+१४३.५१)
निफ्टी : ११,६६९ (+२६.७५)

**सोने** ₹ ५०,९९० (१० ग्रॅम)  **चांदी** ₹ ६१,७०० (१ किलो)



**इलेक्ट्रीक वाहनांना टोलमध्ये सवलत द्या!- आदित्य ठाकरे** (पान- ३)

**अग्रलेख** पान-४
**अर्थचक्राचे शुभवर्तमान**

**उत्पादन क्षेत्राच्या पीएमआयमध्ये वाढ-** (अर्थशक्ति)



**आयपीएलमधून शेन वॉटसन निवृत्त-** (क्रीडा)

## थोडक्यात

### जीएसटीचा दुसरा हप्ता प्रदान

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थ मंत्रालयाने जीएसटी उपकरांची नुकसानभरपाई भरुन काढण्यासाठी ६,००० कोटी रुपयांचा दुसरा हप्ता १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांना सोमवारी प्रदान केला. (सविस्तर वृत्त – अर्थशक्ति)

### काबूल विद्यापीठावर हल्ला; २५ ठार

**काबूल :** अफगाणिस्तानच्या काबूल विद्यापीठावर दहशतवादी हल्ला झाला असून जवळपास २५ पेक्षा अधिकजणांचा मृत्यू झाला आहे. तर, ४० जण जखमी झाले असल्याचे वृत्त आहे. दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले असून चकमक सुरू असल्याचे वृत्त आहे.

### ‘डब्ल्यूएचओ’चे प्रमुख होम क्वारंटाईन

**जिनिव्हा :** जागतिक आरोग्य संघटनेचे प्रमुख टेड्रोस ऍधानॉम घेबरेयेसस यांनाही कोरोनाचा फटका बसला आहे. कोरोनाबाधित व्यक्तीच्या ते संपर्कात आल्याने ते आता होम क्वारंटाईन झाले आहेत. याबाबत त्यांनी स्वतः ट्विटद्वारे ही माहिती दिली आहे.

### न्यूझीलंडच्या मंत्रिमंडळात भारतीय वंशाची व्यक्ती

**वेलिंग्टन :** न्यूझीलंडच्या पंतप्रधान जेसिंडा अर्डर्न यांच्या मंत्रिमंडळात भारतीय वंशाच्या प्रियंका राधाकृष्णन यांची वर्णी लागली आहे. न्यूझीलंडच्या मंत्रिमंडळात स्थान मिळवणाऱ्या प्रियंका या पहिल्याच भारतीय वंशाच्या व्यक्ती आहेत. त्या मूळच्या केरळमधील आहेत.

### नीट पीजी २०२१ परीक्षा लांबणीवर

**नवी दिल्ली :** ‘नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन’ने नीट पीजी २०२१ परीक्षा स्थगित केली आहे. अधिकृत संकेतस्थळावर याबाबतचे नोटिफिकेशन देण्यात आले आहे. त्यानुसार, नीट पीजी २०२१ परीक्षा १० जानेवारी २०२१ रोजी होणार होती. मात्र आता पुढील आदेश येईपर्यंत ही परीक्षा स्थगित करण्यात आली आहे.

### गंगवार यांच्या कुटुंबातील ७ जणांना कोरोना संसर्ग

**बरेली :** केंद्रीय मंत्री संतोष गंगवार यांच्या पत्नीसहीत कुटुंबातील सात सदस्य कोरोना संक्रमित आढळले आहेत. परंतु, सुदैवाने संतोष गंगवार यांच्या कोरोना चाचणीत मात्र ते कोरोना संक्रमित नसल्याचे आढळले आहे.

### ‘त्या’ न्यायाधीशांना शिक्षा करण्याची गरज - वेणुगोपाळ

नवी दिल्ली : छेडछाडीच्या गुन्ह्यातील आरोपीला पीडित तरुणीकडून राखी बांधून घेण्याच्या अटीवर जामीन मंजूर करणाऱ्या मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्णयावर ॲटर्नी जनरल के. के. वेणुगोपाळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून ‘त्या’ न्यायाधीशांना शिक्षा करण्याची गरज असल्याचे म्हटले आहे.

# मुंबई पालिका कर्मचाऱ्यांची दिवाळी दणक्यात

## १५,५०० रुपये सानुग्रह अनुदान जाहीर

**प्रतिनिधी/मुंबई**

कोरोनामुळे आर्थिक संकटानंतरही यंदा पालिका कर्मचाऱ्यांना १५,५०० रुपये सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आले आहे. यामुळे पालिकेच्या १ लाख ५ हजार कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड झाली आहे. महापौर किशोरी पेडणेकर यांनी आज ही सानुग्रह अनुदानाची घोषणा केली. यावेळी उपमहापौर ॲड. सुहास वाडकर सभागृह नेत्या विशाखा राऊत, स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव, शिक्षण समिती अध्यक्षा संध्या दोशी व कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. दरम्यान, पालिका कर्मचाऱ्यांसाठी सानुग्रह अनुदानासाठी अर्थसंकल्पात १५३.१४ लाखांची तरतूद केल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांच्यासोबत महापालिकेमध्ये झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत

यासंदर्भात निर्णय घेण्यात आला. त्यामुळे कोरोनाच्या काळामध्ये आर्थिक संकटात सापडलेल्या पालिका कर्मचाऱ्यांना मुंबई महानगर पालिकेकडून खुशखबर मिळाली आहे. यामध्ये पालिका कर्मचारी, शाळेतील शिक्षक-कर्मचारी, आरोग्य स्वयंसेविका अशा वेगवेगळ्या श्रेणींसाठी ही घोषणा करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त इक्बालसिंह चहल यांनी कर्मचाऱ्यांना मागील वर्षांच्या तुलनेत ५०० रुपयांनी वाढ करून देण्याची तयारी दर्शवली होती.

महापौरांसोबत झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार पालिका कामगार-कर्मचाऱ्यांना १५ हजार ५००, अनुदानप्राप्त खासगी प्राथमिक शाळेतील कर्मचारी-शिक्षकांना ७ हजार ७५०, शिक्षण खात्याच्या मनपा प्राथमिक शाळेतील शिक्षण सेवकांना ४ हजार ७०० तर अनुदानप्राप्त खासगी प्राथमिक शाळेतील शिक्षण सेवकांना २३५० रुपये इतका बोनस देण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्याशिवाय सामाजिक आरोग्य स्वयंसेविका यांना भाऊबीज भेट म्हणून ४ हजार ४०० रुपये देण्यात येणार आहेत. यासंदर्भातील परिपत्रक मुंबई महापालिकेकडून जाहीर करण्यात आले आहे.



**मिळणारे सानुग्रह अनुदान**
- पालिका कर्मचारी – १५,५०० रू
- माध्यमिक शिक्षक ७,७५०/–रू
- अनुदानित शिक्षक ४,७००/–
- खाजगी प्राथमिक शिक्षणसेवक २,३५०/– रू
- आरोग्य स्वयंसेविका ४,४००/– रु (भाऊबीज भेट)

# राज्यात कोरोनाची दुसरी लाट येण्याची शक्यता कमी

## आरोग्यमंत्री राजेश टोपे यांचे मत

**वृत्तसंस्था/मुंबई**

ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात राज्यातील कोरोना रुग्णसंख्येत पुन्हा एकदा किंचित वाढ दिसून येत आहे. त्यामुळे ही दुसऱ्या लाटेची सुरुवात आहे का याकडे तज्ज्ञ डॉक्टरांचे लक्ष आहे. मात्र, राज्यामध्ये कोरोनाची दुसरी लाट येण्याची शक्यता कमी असल्याचे मत राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी व्यक्त केले आहे. तसेच दुसऱ्या लाटेची शक्यता वर्तवण्यात येत असली तरी त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी राज्य सरकारची पूर्ण तयारी झालेली आहे, असेही टोपे यांनी म्हटले आहे.



मंत्रिमंडळासमोर जे प्रेझेन्टेशन झाले त्यामध्ये आरोग्य विभागाच्या सचिवांनी प्रकर्षाने सांगितले की, महाराष्ट्र आणि आपल्या देशात दुसरी लाट येण्याची शक्यता फार कमी आहे. मात्र, ही शक्यता आहे. आपण ज्या अटी-शर्ती घातल्या आहेत, त्यामध्ये सोशल डिस्टन्सिंग ठेवणे, मास्क घालणे, हात सॅनिटाइज करणे या गोष्टी पाळाव्याच लागणार आहेत, असे टोपे म्हणाले. फ्रान्स, स्पेनसह सध्या युरोपमधील अनेक देशात कोरोनाची दुसरी लाट आली आहे. त्यामुळे तिकडच्या अनेक देशांमध्ये पुन्हा लॉकडाऊन करण्यात आले आहे. यासंदर्भात बातम्या आपण ऐकत आहोत, पाहत आहोत. साहजिकच आपल्याकडेदेखील कोरोनाची दुसरी लाट येईल का अशी चर्चा सुरू आहे. मात्र, आपल्याकडे कोरोनाची दुसरी लाट येण्याची शक्यता कमी आहे, असे मत आरोग्यमंत्र्यांनी व्यक्त केले आहे. दिवाळीच्या तोंडावर अनेकजण बाहेर पडताना शॉपिंग करताना दिसत आहेत. मात्र हे करतानाही काळजी घेण्याची सूचना मी जनतेला करेन, असे टोपे यांनी म्हटले आहे.

**मंदिरे दिवाळीनंतरच उघडणार**

राज्यामधील मंदिरे उघडण्यासंदर्भातील प्रश्नावर उत्तर देताना टोपे यांनी, मंदिरे बंद रहावी असे आम्हालाही वाटत नाही. मात्र, सध्याच्या परिस्थितीचा विचार करता मंदिरे उघडण्यासंदर्भात दिवाळीनंतरच मुख्यमंत्री चर्चा करुन निर्णय घेतील, अशी माहिती त्यांनी दिली. मागील काही आठवड्यांपासून विरोधी पक्षाने मंदिरं उघडण्यावरुन अनेकदा सरकारवर टीका केल्याचे पाहायला मिळत आहे.

**लग्न समारंभासाठी मर्यादा वाढवणार?**

राज्यात कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर लग्न समारंभासाठी अटी व शर्तीसह ५० लोकांना परवानगी देण्यात आली होती. आता मात्र लवकरच या संख्येत वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, अशी माहिती राजेश टोपे यांनी दिली.

# ‘टीआयएफआर’चा दुसरी लाट येण्याचा इशारा

देशात कोरोनाचे सर्वाधिक रुग्ण असणाऱ्या आणि आर्थिक झळ बसलेल्या महाराष्ट्राच्या राजधानीत कोरोनाची दुसरी लाट येणार असल्याचा इशारा ‘टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च’च्या तज्ज्ञांनी दिला आहे. तज्ज्ञांनी यासाठी दिवाळीनंतरचा काळ धोक्याचा असल्याचे म्हटले आहे. मुंबईला पुढील महिन्यात कोरोनाचा मोठा धोका असून मे किंवा सप्टेंबरसारखी रुग्णांमध्ये वाढ दिसून येईल, असे टाटा इन्स्टिट्यूटने म्हटले आहे.

# मराठा आरक्षण : घटनापीठ स्थापन करण्याबाबत लवकरच निर्णय

**वृत्तसंस्था/मुंबई**

मराठा आरक्षणाबाबत घटनापीठ स्थापन करण्याच्या राज्य शासनाच्या अर्जावर लवकरात लवकर निर्णय घेणार असल्याचे सरन्यायाधिशांनी म्हटले आहे. ही अतिशय सकारात्मक बाब आहे. त्यानुसार ते लवकरात लवकर घटनापिठाची स्थापना करतील व त्या घटनापिठासमोर मराठा आरक्षणाच्या प्रकरणाची सुनावणी होईल अशी आम्हाला अपेक्षा आहे, अशी माहिती राज्य मंत्रिमंडळाच्या मराठा आरक्षणविषयक उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाच्या तीन सदस्यीय खंडपीठाने ९ सप्टेंबर २०२० रोजी दिलेल्या अंतरिम आदेशामुळे नोकरभरती व शैक्षणिक प्रवेशप्रक्रियेतील एसईबीसी प्रवर्गाचे हजारो विद्यार्थी प्रभावित झाले आहेत. त्याचे अनेक गंभीर परिणाम झाले आहेत. त्यामुळे हा अंतरिम आदेश रद्द करण्याच्या राज्य शासनाच्या अर्जावर घटनापीठासमोर तातडीने सुनावणी आवश्यक असल्याची विनंती रोहतगी यांनी आज सरन्यायाधीशांना केली. राज्य शासनाने यापूर्वी दोन वेळा म्हणजे ७ ऑक्टोबर आणि २८ ऑक्टोबर रोजी लेखी अर्ज सर्वोच्च न्यायालयात सादर केल्याचेही रोहतगी यांनी निर्दशनास आणून दिले. त्यावर या अर्जाबाबत लवकरात लवकर विचार केला जाईल, असे सरन्यायाधीशांनी सांगितले.

घटनापीठाची तातडीने स्थापना करून त्यांच्यासमोर मराठा आरक्षणाबाबतचा अंतरिम आदेश स्थगित करण्याच्या मागणीवर सुनावणी करण्याचा लेखी अर्ज यापूर्वी दोन वेळा केलेला असला तरी आज सोमवारी २ नोव्हेंबर रोजी याच मागणीचा लेखी अर्ज तिसऱ्यांदा सादर करण्यात आल्याचे अशोक चव्हाण म्हणाले.

**अशोक चव्हाण यांनी दिली माहिती**



**आंदोलनामागे राजकीय षडयंत्र**

मराठा आंदोलनात राजकीय लोक घुसले असून त्यांना मराठा आणि ओबीसी असा वाद लावायचा आहे, असा गंभीर आरोप अशोक चव्हाण यांनी केला. काही पक्षांकडून राजकीय षडयंत्र केले जात असून ओबीसी विरुद्ध मराठा असा वाद लावून त्याचा राजकीय फायदा त्यांना उठवायचा आहे, असे ते म्हणाले.

# विधान परिषद नियुक्त्यासंदर्भात फडणवीस व राज्यपालांचे आधीच ठरलंय!

**वृत्तसंस्था/कोल्हापूर**

**ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांचा गौप्यस्फोट**

विधान परिषदेतील राज्यपाल नियुक्त जागांसाठी महाविकास आघाडी सरकारकडून पाठवली जाणारी १२ सदस्यांची नावे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे बाजूला ठेवणार आहेत. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस व राज्यपाल यांच्यात झालेल्या चर्चेत हे ठरले आहे, असा गौप्यस्फोट राज्याचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी आज पत्रकार परिषदेत केला.

विधान परिषदेत राज्यपाल नामनिर्देशित १२ जागा भरावयाच्या आहेत. या जागांवरील उमेदवार हे विविध क्षेत्रातील असावेत, असा निकष आहे. ते तसे नसल्यास राज्यपाल ती नावे नाकारू शकतात. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारने अत्यंत काळजीपूर्वक नावे सुचवण्याचं ठरवलं आहे. त्या पार्श्वभूमीवर हसन मुश्रीफ यांनी हे वक्तव्य केले आहे. आमदार विनय कोरे यांच्या मातोश्रींचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या सांत्वनासाठी चंद्रकांत पाटील वारणा येथे गेले होते. तिथे विनय कोरे यांच्याशी बोलताना पाटील यांनी हे विधान केल्याचा दावा मुश्रीफ यांनी केला आहे.

राज्यपालांचा राज्यकारभारात हस्तक्षेप सुरू आहे. राज्य सरकारच्या अनेक अध्यादेशांवर राज्यपाल वेळेवर सह्या करत नाहीत. संविधानाच्या पलीकडे जाऊन ते राजकीय निर्णय घेत आहेत, असा गंभीर आरोप मुश्रीफ यांनी यावेळी केला.

**काँग्रेस नेत्यांनाही सुनावले!**

सरकारमध्ये असूनही काँग्रेसचे काही नेते सतत नाराजी व्यक्त करतात. त्यामुळे भाजपला टीका करण्याची आयती संधी मिळते. यापुढे काँग्रेसच्या नेत्यांनी टीका करताना भान ठेवावे. तारतम्य बाळगावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

**यादी राज्यपालांकडे गेलीच नाही**

राज्यपाल नियुक्त सदस्यांसाठी महाविकास आघाडी सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर केलेली यादी अद्याप राज्यपालांकडे पाठवण्यात आलेली नाही. राज्यपालांनी ही यादी नाकारु नये म्हणून या यादीतील नावांची पुन्हा-पुन्हा अगदी बारकाईने छाननी करण्यात येत असल्याचे समजते.

### अमेरिकेत प्रारंभी साडेनऊ कोटी नागरिकांचे मतदान

**न्यूयॉर्क :** अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत सुरुवातीच्या टप्प्यात सुमारे ९.५ कोटी नागरिकांनी मतदान केले आहे. उपलब्ध माहितीनुसार, एकूण नऊ कोटी ५० लाख २७ हजार ८३२ नागरिकांनी मतदान केले असून त्यातील तीन कोटी ४५ लाख ७६ हजार १६६ मतदारांनी आपले मत वैयक्तिकरित्या नोंदवले.

# राज्यात एक लाख कोटी गुंतवणुकीचे लक्ष्य - मुख्यमंत्री

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्यात एक लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे लक्ष्य पूर्ण करणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत आज एमआयडीसी आणि विविध कंपन्यांमध्ये सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. याद्वारे १५ कंपन्यांमार्फत जवळपास ३४,८५० कोटींची गुंतवणूक राज्यात होत आहे. तसेच यामुळे सुमारे २३,१८२ लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, गुंतवणूकदार आणि राज्य शासन यांचा एकमेकांवर विश्वास आहे. मागील सामंजस्य करारातील अनेक प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. सुमारे ६० टक्के उद्योगांच्याबाबतीत जमीन अधिग्रहणासारख्या प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत ही निश्चितच समाधानाची बाब आहे. यावेळी उद्योगमंत्री सुभाष देसाई, राज्यमंत्री आदिती तटकरे, मुख्य सचिव संजय कुमार व संबंधित गुंतवणूकदार उपस्थित होते.
(सविस्तर वृत्त : अर्थशक्ति)

# कमलनाथ यांना सुप्रीम कोर्टाचा दिलासा

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

काँग्रेसच्या स्टार प्रचारक यादीतून कमलनाथ यांचे नाव वगळण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. कोणतेही नाव स्टार प्रचारक यादीतून हटवणे निवडणूक आयोगाच्या अधिकार क्षेत्रात येत नसल्याचे यावेळी सरन्यायाधीश एस. ए. बोबडे यांनी स्पष्ट केले आहे.

यादरम्यान, प्रचार संपुष्टात आला असून कमलनाथ यांची याचिका निष्प्रभावी झाल्याचे निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयासमोर म्हटले. यावर, ‘आम्ही हे प्रकरण व्यापक पद्धतीने पाहू... हे तुमच्या अधिकारक्षेत्रात येत नाही’ असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला उत्तर देण्यासाठी नोटीस धाडली आहे. ‘स्टार प्रचारक यादीतून उमेदवाराचे नाव हटवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला कुणी दिला? तुम्ही निवडणूक आयोग आहात की एखाद्या पक्षाचे नेता?’ असे प्रश्न उपस्थित करतानाच निवडणूक आयोग एखाद्या स्टार प्रचारकाचे नाव यादीतून हटवू शकतं किंवा नाही? याबद्दल सर्वोच्च न्यायालय पडताळणी करणार असल्याचेही सरन्यायाधीश बोबडे यांनी म्हटले आहे. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते कमलनाथ यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. कमलनाथ यांच्याकडून दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश एस. ए. बोबडे, न्यायमूर्ती ए. एस. बोपन्ना आणि न्यायमूर्ती व्ही. रामासुब्रमण्यम यांचे खंडपीठ सुनावणी करत आहे. निवडणूक आयोगाने आपल्या मूलभूत अधिकारांचे हनन केल्याचा आरोप कमलनाथ यांनी या याचिकेद्वारे केला आहे.

### १४व्या वर्षी माझ्यावर लैंगिक अत्याचार

**आमीरच्या मुलीचा धक्कादायक खुलासा**



**वृत्तसंस्था/मुंबई**

अभिनेता आमीर खानची मुलगी इरा खान सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते. ती आपल्या चाहत्यांच्या संपर्कात राहण्यासाठी विविध प्रकारच्या पोस्ट करत असते. अलिकडेच तिने ‘जागतिक मानसिक स्वास्थ्य दिना’च्या निमित्ताने एक व्हिडीओ पोस्ट केला होता. ती देखील कधीकाळी नैराश्यामध्ये होती, असे तिने या व्हिडीओमध्ये म्हटले आहे. परंतु, इतक्या श्रीमंत घरात जन्माला आलेली इरा नैराश्यामध्ये का होती? असा प्रश्न सर्वांनाच सतावत होता. त्या प्रश्नाचे उत्तर तिने दिले आहे. ‘१४ वर्षांची असताना तिच्यावर लैंगिक अत्याचार झाले होते’, असा खळबळजनक खुलासा तिने केला आहे.

# विधान परिषदेच्या पाच जागांसाठी १ डिसेंबरला निवडणूक

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

राज्यपाल नियुक्त विधान परिषद सदस्यांवरून रस्सीखेच चालली असताना राज्यातील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील पाच जागांसाठी येत्या १ डिसेंबर रोजी निवडणूक होणार आहे. निवडणूक आयोगाने आज या निवडणुकीची घोषणा केली. त्यामुळे महाविकास आघाडी व भाजप हे प्रथमच निवडणूक आखाड्यात एकमेकांना भिडणार आहेत.

नागपूर, पुणे व औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ आणि अमरावती व पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी १ डिसेंबर रोजी मतदान होईल. तीन पदवीधर व दोन शिक्षक मतदारसंघांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांचा कार्यकाळ १९ जुलै रोजी संपला होता. त्यानंतर कोरोना साथीमुळे या रिक्त जागांवरील निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या. नागपूर, पुणे व औरंगाबादचे अनुक्रमे अनिल सोले, चंद्रकांत पाटील व सतीश चव्हाण तर, अमरावती व पुणे शिक्षक मतदारसंघातून श्रीकांत देशपांडे व दत्तात्रय सावंत यांनी प्रतिनिधित्व केले.

ऐन दिवाळीच्या उत्सवात निवडणुकीची प्रक्रिया होणार आहे. ५ नोव्हेंबर रोजी अधिसूचना जारी होईल. १२ नोव्हेंबर रोजी नामांकनासाठी अखेरचा दिवस तर, १३ तारखेला छाननी होऊन १७ तारखेपर्यंत अर्ज मागे घेता येईल.

**महाविकास आघाडी व भाजप प्रथमच भिडणार**

# बांगलादेशी घुसखोरांना मदत; काही आमदार संशयाच्या भोवऱ्यात

**वृत्तसंस्था/मुंबई**

बांगलादेशी घुसखोरांना बेकायदेशीररित्या भारताचे नागरिकत्व मिळवून देणाऱ्या एका टोळीचा मुंबई पोलिसांनी पर्दाफाश केला असून त्यांच्याकडे महाराष्ट्रातील एमआयएम व काँग्रेसच्या एका आमदारासह एकूण सात आमदारांची स्वाक्षरी असलेली लेटरहेड मिळाल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान, हा प्रकार धक्कादायक असून देशविघातक कृत्यासाठी या आमदारांना २४ तासांच्या आत अटक करावी, अशी मागणी भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे.

साकीनाका येथून दोन बांगलादेशींना पोलिसांनी अटक केली. बोगस कागदपत्रांच्या आधारे ते मुंबईत राहत असल्याचे तपासात स्पष्ट झाले. त्यांच्याकडून बनावट कागदपत्रे जप्त केल्यानंतर पोलिसांनी याप्रकरणात मालेगाव येथून एका एजंटला अटक केली आहे.

## पॉवरलाईन

संजय मिस्त्री



तुम्ही त्यांना ‘राज्यपालांनी भेटायला सांगितलं आहे’ असं सांगायलाच नको होतं!

# ‘मोदी शायनिंग’साठी रोजचा खर्च दोन कोटी रुपये

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने स्वतःच्या प्रचारासाठी रोज दोन कोटी रुपये खर्च केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. माहिती अधिकार कायद्याअंतर्गत मिळालेल्या आकडेवारीनुसार, मोदी सरकारने मागील आर्थिक वर्षामध्ये वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि होर्डींगच्या माध्यमातून केलेल्या जाहिरातींवर करदात्यांचे ७१३ कोटी २० लाख रुपये खर्च केल्याचे उघड झाले आहे.

**आरटीआयमधून मिळाली माहिती**



सरकारने ही रक्कम जाहिरातबाजी आणि प्रचारासाठी खर्च केली आहे. मुंबईतील माहिती अधिकार कार्यकर्ते जतिन देसाई यांनी आरटीआयअंतर्गत यासंदर्भात माहिती मागवली होती. या अर्जाला उत्तर देताना सूचना आणि प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या ब्युरो ऑफ अकाटरिच ॲण्ड कम्युनिकेशनने दिलेल्या माहितीनुसार, केंद्राने २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये जाहिरातींवर दिवसाला सरासरी एक कोटी ९५ लाख रुपये खर्च केले आहेत.

मागील आर्थिक वर्षामध्ये लोकसभा निवडणुकीबरोबरच महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूकही पार पडली. ७१३ कोटींपैकी इलेक्ट्रॉनिक मीडियावर ३१७ कोटी ५ लाख, प्रिंट मीडियावर २९५ कोटी ५ लाख आणि आऊटडोअर म्हणजेच होर्डींग्ज आणि जाहिरातींवर १०१ कोटी १० लाख रुपये खर्च करण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

मात्र, देसाई यांच्या या अर्जाला उत्तर देताना मोदी सरकारने विदेशातील प्रचारासाठी किती पैसा खर्च केला, यासंदर्भातील माहिती दिलेली नाही. याआधी जून २०१९ मध्ये मुंबईतील आरटीआय कार्यकर्ता असणाऱ्या अनिल गलगली यांनी दाखल केलेल्या एका अर्जाला उत्तर देताना मंत्रालयाने प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, आऊटडोअर आणि प्रिंट प्रचारासाठी एकूण तीन हजार ७६७ कोटी २६ लाख ५१ हजार रुपये खर्च केल्याची माहिती दिली होती.

epaper.freepressjournal.in

